ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# इ. ४थी च्या विदयार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याचा विकास करताना येणा–या समस्यांचा अभ्यास व संभाषण कौशल्य वृदिधंगत होणेसाठी केलेला प्रयोग

**श्रीम. लाड शर्मिला सुभाष**
*जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, म्हावशी ता.पाटण, जि.सातारा*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

लहान मूल ज्या परिसरात वातावरणात वाढत असते ,तेथे त्या ठिकाणी मायबोलीचा वापर होत असतो. हेच मूल ज्यावेळी शाळेत प्रवेश करते, त्यावेळी ते नव्याने इंग्रजी भाषा शिकत असते.या वेळी इंग्रजी भाषेबददल निर्माण झालेली आवड,इंग्रजी शिकण्याविषयीचा उत्साह बघता त्यांना जास्तीत जास्त इंग्रजी भाषेबददलचे ज्ञान कसे मिळेल, इंग्रजी भाषेमध्ये त्यांना कसे पारंगत करता येईल, अशाप्रकारचे अनेक प्रश्न संशोधकाच्या मनात निर्माण झाले.

'हजर' नाही! 'WEL –COME!' या नवोपक्रमामुळे विदयार्थ्यांच्या इंग्रजी शब्द संपत्तीमध्ये वाढ झाली. त्यांच्यामध्ये Listening, Reading, Writing ही कौशल्येवृदिधंगत झाली. या कौशल्यांबरोबरच Speaking हे कौशल्यही आत्मसात होणे गरजेचे आहे, हे लक्षात आल्यामुळे संशोधकास या समस्येचा विचार करणे भाग पडले.

कै. रामकृष्ण मोरे (दिवंगत शिक्षणमंत्री)यांनी इ. १ली पासून अभ्यासक्रमात इंग्रजी विषयाचा समावेश करण्यात यावा, ही संकल्पना मांडली व त्यांनी ती सन २००० पासून प्रत्यक्षात आणली.

शाळेत दाखल होत असताना बालमनाला इतर गोष्टींप्रमाणेच इंग्रजी विषयाबददल भीती वाटत असते.लहानपणापासूनच मुले इंग्रजी भाषेमध्ये सोप्या वाक्यांमध्ये संभाषण करू लागली, तर ती भाषा शिकण्याचा उत्साह वाढेल. त्यामुळे त्यांची इंग्रजी विषयाची भीती कमी होईल, हे लक्षात आल्यामुळे संशोधकाने या समस्येचा विचार करायला सुरूवात केली.

आजचा विदयार्थी हा उदयाचा सुजाण नागरिक आहे. स्पर्धात्मक आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी आजचा विदयार्थी घडविला गेला पाहिजे. इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. आपल्या देशाच्या बाबतीत विचार करायचा तर पं.नेहरुंनीही " English is our major window on modern world." असे म्हंटले होते. यासाठी इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे.

इ. ४ थी ची मुले ज्या वातावरणात वाढत आहेत, ते अत्यंत ग्रामीण आहे.या ठिकाणी विदयार्थ्यांला इंग्रजी संभाषणासाठी फारसे मार्गदर्शन मिळणे. दुरच इंग्रजी संभाषण त्यांच्या कानावर पडत नाही. त्यामुळे शिक्षकांनीच शाळेमध्ये असे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि हे प्रयत्न हसत – खेळात, आनंददायी पदधतीने व्हायला हवेत. प्रभावी संभाषण हे आजच्या स्पर्धात्मक युगातील अत्यंत महत्वाचे कौशल्य मानले जाते.आणि म्हणूनच संशोधकाने या समस्येचा विचार करायला सुरूवात केली.

**पार्श्वभूमी**

विदयार्थ्यांचे इंग्रजी भाषेतील Speaking हे कौशल्य योग्य प्रमाणात विकसित नसेल तर विदयार्थ्यांनी आत्मसात केलेल्या शब्दसंपत्तीचा पाहिजे तेवढा विकास होणार नाही,हे संशोधकाच्या लक्षात आले.

इ. ४थी च्या विदयार्थ्यांमध्ये Listening, Reading, Writing ही कौशल्ये विकसित झालेली आहेत.परंतु, त्यांच्यामध्ये Speaking हे कौशल्यही विकसित होणे तेवढेच गरजेचे आहे. Wealth of English words चा व्यवहारामध्येही उपयोग होणे गरजेचे आहे.विदयार्थी ज्यावेळी खऱ्या अर्थाने इंग्रजी भाषेत आपले मत मांडेल त्यावेळी होणारा आनंद काही वेगळाच असेल.

विदयार्थी English Story चे जे वाचन करणार आहे, ते समजपूर्वक वाचन होणे अत्यंत आवश्यक आहे. तरच त्याला त्या गोष्टीचा आनंद घेता येईल.

तसेच इ. ४थी च्या पाठयपुस्तकाबाहेरची इंग्रजी संपत्ती वाढविण्यासाठी इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. विदयार्थ्यांचा सभाधीटपणा वाढीस लागणेसाठी अत्यंत उपयुक्त असलेले Speaking हे कौशल्य विकसित होणेसाठी संशोधकाला या समस्येचा अभ्यास करण्याची गरज भासली.

विदयार्थ्यांना विविध Story Books मधील Story ऐकवून, video दाखवून त्यांच्याकडून ती Story लिहून घेणे असे विविध उपक्रम राबवून आपणाला विदयार्थ्यांचे Speaking हे कौशल्य विकसित होईल,असे संशोधकाला वाटते.

**संशोधनाची गरज आणि महत्व**

**अ) संशोधनाची गरज :—**

**इंग्रजी शाळांचे आकर्षण कमी होणेसाठी : —**

विदयार्थी जर छोटी छोटी Story Books Reading करत असतील त्या Story स्वत:च्या भाषेत सांगत असतील किंवा छोटी — छोटी वाक्ये एकत्र करून इंग्रजी बोलत आहेत हे पाहून पालक वर्ग नक्कीच आंनदित होईल, यामुळे एक फायदा हा होईल की पालकांचा खाजगी शाळेचा, इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश घेण्याचा ओढा नकळतच मराठी माध्यमांच्या शाळेकडे वळेल. Tell something about Myself, Tell something abut your Teacher, Tell something about your Village or Mother या विषयाचे संभाषण ऐकून मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये देखील चांगल्या प्रकारे इंग्रजी विषयाचे ज्ञानदानाचे काम होत आहे,असा विश्वास पालकांना वाटेल आणि म्हणूनच इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असलेले आकर्षण कमी होण्यास मदत व्हावी यासाठी संशोधकाला या समयस्येचा अभ्यास करण्याची गरज वाटली.

Speaking English मुळे विदयार्थ्यांचा इंग्रजी विषयाबद्दलचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. आपणही English मध्ये बोलू शकतो, याचा अभिमान त्यांना वाटेल, त्यामुळे त्यांना जास्तीत जास्त English Story Books वाचण्याची आवड निर्माण होण्यासाठी संशोधकाला या समस्येचा अभ्यास करण्याची गरज वाटली.

विदयार्थी इंग्रजीतून संभाषण करू लागल्यामुळे त्यांचे इंग्रजी शब्दाचे उच्चार स्पष्ट व योग्य होण्यास मदत होण्यासाठी संशोधकाला या समस्येचा अभ्यास करण्याची गरज वाटली.

वाक्यातील चढ — उतार, आरोह — अवरोह विदयार्थ्यांच्या लक्षात येवून त्यानुसार विदयार्थ्यांनी संभाषण करणे गरजेचे असल्यामुळे संशोधकाने या समस्येचा अभ्यास करणे ठरवले.

**कृती संशोधनाचे महत्व**

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे आणि या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर येईल त्या परिस्थितीला सामोरे जाण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.

विदयार्थ्याचे इंग्रजी भाषेतील संभाषण कौशल्य जर चांगले असेल तर विदयार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होणार आहे. त्यांच्यामध्ये सभाधीटपणा वाढीस लागणार आहे. आपले मत परखडपणे मांडण्याची कला त्यांना सहजगत्या अवगत होणार आहे, त्यासाठी संशोधकाने ही समस्या निवडली आहे.

इंग्रजी भाषेत संभाषण केल्यामुळे विदयार्थ्यांना दररोज नवनवीन इंग्रजी शब्द ऐकण्यास मिळतील. तसेच त्यालाही नवीन शब्द जोडून वाक्यरचना करावी लागेल. यामुळे तो जास्तीत जास्त नवीन शब्द Dictionary मधून शोधण्याचा प्रयत्न करेल. या सर्व गोष्टींमुळे त्याच्या इंग्रजी शब्द संपत्तीत भर पडण्यासाठी ही समस्या महत्त्वाची आहे.

सेमी इंग्रजीच्या वर्गाचे अध्यापन करताना विदयार्थ्यांना Mathematics मधील विविध संकल्पनांचा बोध होण्यासाठी इंग्रजीमधून संभाषण (Speaking in English) ही समस्या महत्वाची आहे.

**समस्या विधान**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा. म्हावशी येथील इ. ४थी च्या विदयार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याचा विकास करताना येणा—या समस्यांचा अभ्यास व संभाषण कौशल्य विकसित होणेसाठी उपक्रम निर्मिती व परिणामांचा अभ्यास.

**कार्यात्मक व्याख्या**

**शाळा** — स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांपैकी एक आहे.

**म्हावशी** — हे सातारा जिल्हातील पाटण तालुक्यातील, कराड— चिपळूण रोडवर वसलेले गाव.

**इ.४थी चे विदयार्थी** — प्राथमिक शाळेतील चौथ्या वर्गात अध्ययन करणारे विदयार्थी

**इंग्रजी संभाषण कौशल्य** — इंग्रजी भाषेत आत्मविश्वासाने अभिव्यक्ती करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य.

**उपक्रम निर्मिती** — इंग्रजी संभाषण कौशल्य विकसनासाठी संशोधकाने राबविलेले उपक्रम किंवा विकसित केलेले उपक्रम.

**परिणामाचा अभ्यास** — पूर्वचाचणी व उत्तर चाचणी यांच्या संपादनातील फरक

**उदिदष्टे —**

१. इ ४ थी च्या विदयार्थ्यांची संभाषण कौशल्याबाबत सदय:स्थिती अभ्यासणे व येणा—या अडचणींचा शोध घेणे.
२. इ. ४थी च्या विदयार्थ्यांच्या संभाषण कौशल्य विकसनासाठी विविध उपक्रमांची निर्मिती करणे व अमंलबजावणी करणे.
३. उपक्रमांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**कृति संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनातील उपक्रम इ.४थीच्या सर्व विदयार्थ्यांना उपयुक्त ठरतील.

**मर्यादा**

१. सदर संशोधण सातारा जिल्हा परिषद अंतर्गत म्हावशी या शाळेतील इ.४थी च्या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित आहे.
२. हे संशोधन इंग्रजी भाषेतील संभाषण कौशल्यापुरतेच मर्यादित आहे.
३. हे संशोधन सन २०१५ – २०१६ मध्ये शिकत असलेल्या इ.४ थी च्या वर्गातील मराठी माध्यमाच्या विदयार्थ्यापुरते मर्यादित आहे.

**परिकल्पना**

जर संशोधकनिर्मित उपक्रमांची अंमलबजावणी केली तर विदयार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याचा विकास होईल.

**संशोधन पदध्ती**

१. **शोधन पदधती** – प्रस्तुत कृतिसंशोधनाचा विषय व क्षेत्र लक्षात घेता संशोधकाने ऐतिहासिक संशोधन, वर्णनात्मक संशोधन, प्रायोगिक संशोधन या प्रमुख पदधती पैकी प्रायोगिक पदधती हा प्रकार निवडला कारण इंग्रजी संभाषण कौशल्याच्या परिणाम कारकतेचा अभ्यास हा कृतिसंशोधनाचा विषय शिक्षण क्षेत्रातील विदयार्थ्यांचे संभाषण कौशल्य विकसित करण्याच्या क्षेत्रात येतो. महाराष्ट्र शासनाने सन २००० पासून इंग्रजी हा विषय मराठी माध्यमातील शाळांसाठी इ. १ली पासून सुरु केला आहे. इंग्रजी विषयाचे महत्व लक्षात घेता विदयार्थ्यांचे इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित व्हावे, हा मुख्य उद्देश आहे आणि तो उद्देश साध्य होण्यासाठी या संशोधनाच्या पद्धतीचा एकत्रित उपयोग केला आहे.
२. **नमुना निवड** – सातारा जिल्हातील पाटण तालुक्यातील म्हावशी शाळेतील इ. ४थी मध्ये २८ विदयार्थी आहेत.या विदयार्थ्यामध्ये Listening, Reading, Writing ही कौशल्ये अवगत आहेत. हे दिसून आले,परंतु Speaking in English हे कौशल्य विकसित झालेले नाही. हे दिसून आले, त्यामुळे नमुना निवडीद्वारा निवड केली.
३. **संशोधन साधन निवड** – प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संशोधन उदिदष्टांच्या अनुरोधाने आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी निरीक्षण व पडताळा सूची साधने निवडली इ.४थी च्या विदयार्थ्यासाठी विविध उपक्रम राबवून विदयार्थ्याचे निरीक्षण व पडताळा सूची वापरुन त्यांच्याद्वारे आवश्यक माहिती संकलित केली.
४. **सांख्यिकीय तंत्राची निवड** – कृतिसंशोधनात संख्यात्मक माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण करण्यासाठी विविध तंत्राचा वापर करण्यात येत असतो. प्रस्तुत कृतिसंशोधनाचे स्वरूप पाहता शेकडेवारीचा वापर करण्यात आलेला आहे.

प्राप्त झालेल्या संख्यात्मक माहितीचे आकलन सुलभ आणि अर्थपूर्ण होण्यासाठी त्याचे लहान संचामध्ये कोष्टक किंवा आलेख यांच्या स्वरूपात रूपांतर केले जाते. प्रस्तुत कृतिसंशोधनातही कोष्टक सहाय्याने प्राप्त माहितीला अधिक ठळकपणे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**कृति कार्यक्रम निर्मिती**

पूर्व चाचणीतून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर पाटण तालुक्यातील म्हावशी शाळेतील इ. ४थी च्या विदयार्थ्याच्या इंग्रजी संभाषणातील नेमक्या अडचणी कोणत्या हे संशोधकाच्या लक्षात आले.या विश्लेषणातून लक्षात आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, त्या संदर्भात उपाययोजना करणे हा संशोधनातील पुढील टप्पा असतो.

प्राथमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या इंग्रजी संभाषणातील अडचणी जाणून घेवून त्या दूर करण्यासाठी इंग्रजी भाषेतील विविध उपक्रम व Activities चा वापर करण्यात आलेला आहे.

१. Story Reading - या उपक्रमासाठी संशोधकाने विदयार्थ्यांना छोटी छोटी, सोप्या वाक्यरचनेची गोष्टींची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली,यातील गोष्टींचे शिक्षकाने प्रकट वाचन घेतले.यामुळे विदयार्थ्यांना समजपूर्वक वाचण्याचा आनंद मिळाला.

२. Story Listening - विदयार्थ्याने वाचलेली Story शिक्षकाने पुन्हा स्वतःच्या सोप्या शब्दांमध्ये विदयार्थ्यांना ऐकवली यामुळे ही गोष्ट विदयार्थ्यांच्या लक्षात राहण्यास मदत झाली.

3. Story Telling - वाचलेली, शिक्षकांच्याकडून ऐकलेली तीच Story विदयार्थी सांगण्याचा प्रयत्न करू लागला, परिपाठावेळी योग्य चढउतारासहित, हावभावयुक्त Story सांगू लागला. त्यामुळे त्याच्या Speaking in English चा आत्मविश्वास वाढू लागला.

4. Role Play - विदयार्थ्यांना छोटी नाटिका देवून विदयार्थ्यांनी त्यांच्यामध्ये सहभागी होवून Role Play केला.त्यामुळे त्यांचा आनंद द्विगुणित झाला.इंग्रजी विषयी त्याला वाटणारी भीती कमी झाली. आनंददायी वातावरणामध्ये तो विविध भूमिका वटवू लागला.

5. Practice of conversation - विदयार्थ्यांना सोप्या वाक्यांची छोटी – छोटी संभाषणे वर्गामध्ये सादर करण्यास सांगितली आणि त्यांचा सराव घेतला.

For Example

Meena : Please, give me your pen.

Seeta : Yes, it is.

Meena : Thank you.

Seeta : Welcome.

यामुळे विदयार्थी आपआपल्या मित्र मैत्रिणींमध्ये मनमोकळेपणाने इंग्रजीमध्ये गप्पा मारू लागले.

6. Dramatization - शिक्षकांनी वर्गातील विदयार्थ्यांना English मधून नाटिका देवून त्याचा सराव घेतला. विदयार्थ्यांनी ‘Swacchata Abhiyan ’, ‘A Role of Part of Body’, ‘Rabbit and Fox ’ , अशा प्रकारच्या छोटया नाटिका इंग्रजीमधून सादर केल्या. त्यामुळे इंग्रजी मधून बोलण्याची भीती हळूहळू कमी झाली.

7. Tell about myself - विदयार्थ्यांना त्यांची स्वतः विषयीची माहिती इंग्रजीमधून सांगण्यास सांगितली.

8. Listen story showing on L.C.D. projector - शिक्षकांनी L.C.D Projector वर काही English Story विदयार्थ्यांना ऐकवल्या. त्यामुळे Story हावभावयुक्त सांगण्याचे धाडस वढले.

9. Sing Rhymes – पाठयपुस्तकातील, पाठयपुस्तकाबाहेरील विविध rhymes विदयार्थ्यांकडून कृतीयुक्त, हावभावायुक्त योग्य चढउतारासहित सादर करून घेतल्या, त्यांचा वारंवार सराव घेतला.

10. Language Games – शिक्षकांनी इंग्रजी मधून विविध भाषिक खेळ घेतले.For Example .Who want a chocklate, Game of Words, Game of Sentences असे विविध भाषिक खेळ घेवून त्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

अशा प्रकारे वेगवेगळे खेळ, नाटिका, संभाषण यांचा सराव घेवून त्यांनां इंग्रजीमध्ये संभाषण करण्यासाठी प्रवृत्त केले. विदयार्थी हा अडखळल्यावर लगेच त्याला मदत

करण्यात आली व अधिकाधिक नवीन शब्द वापरून त्यांना वाक्ये तयार करावीत यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

विदयार्थी संभाषण करीत असताना त्याने पूर्ण वाक्यातच बोलावे असा आग्रह न धरता त्यांच्यात इंग्रजी संभाषणाविषयी आत्मविश्वास कसा निर्माण होईल यावर भर देण्यात आला.

**सामग्री विश्लेषण व पडताळा**

प्रस्तुत कृतिसंशोधनात विदयार्थ्यांची प्रथम पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली आहे.सर्वेक्षण व प्रायोगिक अशा दोन्ही संशाधन पद्धतीची सांगड घालून माहितीची संकलन करण्यात आलेले आहे.

सातारा जिल्हातील पाटण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,म्हावशी शाळेतील इयत्ता ४थी च्या विदयार्थ्यांकडून इंग्रजी विषयाची पूर्व चाचणी (oral Test) घेण्यात आली.या पूर्वचाचणीच्या माहितीच्या आधारे विश्लेषण करुन त्यानुसार कृतिकार्यक्रम राबविण्यात आला व त्यानंतर पुन्हा विदयार्थ्यांची उत्तर चाचणी म्हणजे दुसरी oral Test घेवून दोन्ही चाचण्यांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले व त्यानंतर अंतिम निष्कर्ष काढण्यात आले.

हे विश्लेषण करताना तक्त्यांचा व आवश्यक तेथे आलेखांचा वापर करण्यात आला. इंग्रजी भाषा संभाषणात विविध Activities किती उपयुक्त ठरु शकतात,हे पाहण्यासाठी या प्रक्रियेचा उपयोग झाला.

**फलनिष्पत्ती**

१. विविध उपक्रम राबविल्यानंतर ८९ टक्के विदयार्थ्यांच्या आत्मविश्वासात चांगली वाढ झाली. २९ टक्के विदयार्थ्यांमध्ये वाढ कमी प्रमाणात झाली.
२. संभाषण कौशल्याच्या आघात, उच्चार, लयबद्धता व्याकरण दृष्टया योग्यता इत्यादींमध्ये चागंली वाढ झाली.आणि २९ टक्के विदयार्थ्यांमध्ये वैशिष्टयांचा विकास कमी प्रमाणात दिसून आला.
३. विविध उपक्रम राबविताना सर्व विदयार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.
४. प्रश्न उत्तराच्या कृतीमध्ये २५ विदयार्थ्यांनी चांगल्या प्रकारे सहभाग घेतला तर तीन विदयार्थ्यांनी मध्यम प्रमाणात सहभाग घेतला
५. २३ विदयार्थी Speaking करताना Fluency बोलू लागले तर तो आवडीने गोष्ट सांगू लागले.

**शिफारशी**

१. इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित होणेसाठी शांळानी वर्षभर उपक्रम राबवावेत.
२. इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित होणेसाठी वर्गामध्ये शिक्षक – विदयार्थी चर्चा इंग्रजीमधून घडून यावी.
३. विदयार्थ्यांना आपले विचार, भावना व्यक्त करण्यासाठी विविध संधी वर्गात शाळेत उपलब्ध करुण दयाव्यात

**संदर्भ**

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे*
*R.K. and Harrison J.B (2006) Spoken English*
*Orient langman Publication , Chennai*
*Maharashtra state Bureau of Texbook Production & Curriculum research*
*Pune - My English Book 2015*